## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. ७५४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०९/११/२०१७

**१) बॅग मधुन नगदी ४८,०००/—रुपये लंपास केले. :—**

दिनांक ८/११/२०१७ चे १३.०० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी नुपुर श्रीपाद हुकरे वय २३ वर्ष रा. निवार्ण हॉस्पिटल जवळ नेहरू रोड तकिया वार्ड भंडारा हा केशव भवन भंडारा येथील एस.बि.आय. एटीएम मध्ये पैसै काढण्यास गेला. तेव्हा त्याचे खांदयाला लटकवुन ठेवलेल्या बॅग मधुन नगदी ४८,०००/—रुपये एका अनोळखी आरोपी मुलीने वय अंदाजे २२ वर्ष वयोगटातील रंग सावळा अंगात काळा सलवार व पांढरी ओढणी घातलेल्या मुलीने काढुन नेले. अशा फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भा.दं.वी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.उप.नि. थेरे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**२) सोन्याच्या दागिन्याची व नगदी पैशाची चोरी. :—**

दिनांक ०८/११/२०१७ चे १०.३० ते १२.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी राजशेखर सुरेश गजभिये वय २३ वर्ष रा. बि टाईप क्वा. १०/२ जवाहरनगर हा त्याच्या घराला ताला लावुन घराची चाबी समोरील खिडकीत ठेवुन बाहेर गेला असतांना कोणीतरी अज्ञात चोराने ती चाबी घेवुन समोरील दाराचा ताला खोलुन आत प्रवेश करून आलमारीतील लॉकर मध्ये ठेवलेला १ सोन्याचा मंगळसुत्र ३० ग्रॅम, सोन्याचा नेकलेस २ नग प्रत्येकी १५ ग्रॅम, सोन्याचा मंगळसुत्र १८ ग्रॅम, सोन्याचे कानातील रिंग २ नग प्रत्येकी ३ ग्रॅम, सोन्याची अंगठी २ नग प्रत्येकी ३ ग्रॅम व नगदी २०,०००/—रुपये असा एकुण १,७६,०००/—रुपया चा माल चोरून नेला. अशा फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ४५४,३८० भादंवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास स.पो.नि. नेवारे पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

**३) लोखंडी सलाखीची चोरी :—**

दिनांक ६/११/२०१७ चे १८.३० वाजता ते ७/११/२०१७ चे ०८.३० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी अरूण गोपिचंद भुरे वय ४८ वर्ष रा. किटाडी याचे मोहाडी येथील अखील ट्रेडर्स समोर ठेवलेल्या लोखंडी सलाखी पैकी लोखंडी सलाखी १२ एम.एम. च्या ४५० किलो, १० एम.एम च्या ३,००० किलो, १६ एम.एम. च्या २५० किलो, ८ एम.एम ची १,००० किलो असा एकुण ४,७०० किलो एकुण किंमत १,६९,२००/—रुपया चा माल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला. अशा फिर्यादीच्या तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ३७९ भा.दं.वी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.हवा. गि—हेपुंजे पो.स्टे. मोहाडी हे करीत आहेत.

४) मोटार सायकलच्या धडकेत एकाचा मृत्यु.:–

दिनांक ७/११/२०१७ चे २१.०० वाजता दरम्यान यातील मोटार सायकल क्रमांक एम.एच ३५ क्यु ०८८९ चा चालक युगल विजय पावनकर व मागे बसलेला ईसम पराग बाबुराव नंदेश्वर वय २४ वर्ष रा. तिरोडा याचे मोटार सायकल ला विरूध्द दिशेने येणा–या यातील आरोपी मोटार सायकल चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन मोटार सायकल ला श्रीनगर शिवार येथे धडक मारल्याने पराग नंदेश्वर याचे डोक्याला मार लागला. त्यामुळे त्यास औषधोपचारा करीता सामान्य रूग्णालय भंडारा येथे उपचारा करीता आणीत असतांनी तो मरण पावला. डॉक्टर मेमो वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे अपराध क्रमांक ००/१७ कलम २७९,३०४(अ) भा.दं. वि. नोंद करण्यात आला. सदर गुन्हयाचे कागदपत्र पोलीस स्टेशन अडयाळ येथे प्राप्त झाल्याने पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम २७९,३०४(अ) भा.दं.वी. चा गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.उप.नि. डोंगरे पो.स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

५) अज्ञात वाहनाची मोटार सायकल ला धडक, मो.सा. चालकाचा मृत्यु.:–

दिनांक ८/११/२०१७ चे ७.०० वाजता ते ०७.२८ दरम्यान यातील मृतक– सुशील नामदेवराव बनकर वय ३८ वर्ष रा. सिव्हील वार्ड साकोली हा त्याचे हिरो ग्ल्यामर मोटार सायकल क्रमांक एम.एच. ३६ डब्लु ६३६१ ने साकोली वरून भंडा–या कडे जात असतांना यातील अज्ञात आरोपी वाहन चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन मृतकाचे मोटार सायकल ला मुंडीपार सडक एन.एच. ६ रोड येथे धडक देवुन त्याचे मरणास कारणीभुत झाला. अशा फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २७९,३०४(अ) भा.दं.वी. सहकलम १८४,१३४(ब) मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोलीस निरीक्षक चकाटे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

६) मोटार सायकल ची डिवायडरला धडक, मोटार सायकल चालकाचा मृत्यु .:–

दिनांक ८/११/२०१७ चे ८.३० ते ८.४१ वाजता दरम्यान यातील मृतक–मोटार सायकल चालक याने त्याच्या ताब्यातील मोटार सायकल ही भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन राजेगाव एम.आ.डि.सी. एन.एच. ६ रोडच्या बाजुला असलेल्या सिमेंटच्या डिवायडर ला धडक मारून स्वत:च्या मरणास काणीभुत झाला. अशा फिर्यादी अजय पृथ्वीराज सलामे वय २५ वर्ष रा. किन्ही/गडेगाव यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखणी येथे कलम २७९,३०४(अ) भा.दं.वी. सहकलम १८४ मो. वा.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक आडे पो.स्टे. लाखणी हे करीत आहेत.

७) अवैध दारू /जुगार अंड्डयांवर धाडी . :–

दिनांक ८/११/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन भंडारा, कारधा, साकोली व अडयाळ येथील अवैध दारू/जुगार अड्डयांवर धाडी घालुन एकुण ८ गुन्हे दाखल करून

आरोपीतांच्या ताब्यातुन ५० लिटर हातभट्टी दारू किंमती ५,०००/—रूपया चा माल तसेच जुगारातुन ४९,३३०/— रुपये असा एकुण ५४,३३०/— रुपया चा माल जप्त करण्यात आला.

<u>८) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—</u>

दिनांक ८/११/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १०४ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवाशी ०२ तीन सिटर वाहनांवरती १५ केसेस व ईतर वाहनांवरती ८७ केसेस करण्यात आलेले आहे.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.